# सुगम भक्तीयोग (नामसंकीर्तनयोगाच्या सोप्या विवेचनासह !)

## अनुक्रमणिका

विषयसूची


| | |
|---|---|
| 卐 सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची वैशिष्ट्ये ! | ८ |
| 卐 मनोगत | ९ |
| 卐 ‘सुगम अध्यात्मशास्त्र’ या ग्रंथमालिकेतील ३ खंडांत पू. बाळाजी (पू. दादा) आठवले यांच्याविषयी दिलेल्या माहितीची अनुक्रमणिका | १० |
| 卐 पू. बाळाजी (पू. दादा) वासुदेव आठवले यांची संक्षिप्त ओळख | ११ |
| 卐 पू. बाळाजी (पू. दादा) वासुदेव आठवले यांना जीवनभर साथ देणाऱ्या पत्नी पू. नलिनी (पू. ताई) आठवले यांची वैशिष्ट्ये | ११ |
| 卐 पू. दादांनी मुलांवर लिहिलेले काव्य | १६ |
| 卐 पाचही मुलांची साधनेत प्रगती होण्यासाठी त्यांच्यावर लहानपणापासूनच संस्कार करणारे पू. दादा आणि पू. ताई ! | १७ |
| 卐 प्रकरण | |
| १. साधना | १९ |
| २. भक्तीयोग | ३७ |
| ३. ईश्वर आणि अवतार | ५६ |
| ४. श्रीराम | ५८ |
| ५. उपवास | ५९ |
| ६. नामस्मरण | ६१ |
| ७. मंत्र | ८४ |
| ८. श्रद्धा | ८५ |

# मनोगत

‘हरीला भक्तीचे बंधन, घासितो नाथाघरी चंदन ।’ या भजनपंक्तीत सनातन संस्थेचे श्रद्धास्थान प.पू. भक्तराज महाराज यांनी भक्तीचे मर्म उलगडले आहे. संत एकनाथांच्या घरी काम करणारा आणि जनाबाईची लुगडी धुणारा विठ्ठल त्यांच्या निस्सीम भक्तीमुळेच त्यांच्या घरी राबला. भक्त आपल्या भाव-भक्तीने देवाला जिंकतो आणि मग देवच भक्ताचा दास बनतो. ‘जो (देवापासून) विभक्त नाही, तो भक्त’, या वचनानुसार साधनेत देवावर संपूर्ण श्रद्धा ठेवून त्याच्याशी एकरूप होणारा भक्तच ईश्वरप्राप्ती करून घेतो. या भवसागरातून पार पडण्यासाठी भक्तीयोगाची नितांत आवश्यकता आहे. भक्तीमार्ग हा भगवंतप्राप्तीचा अत्यंत सोपा आणि सर्वांनाच आचरणात आणता येणारा सहज सुलभ मार्ग आहे.

प्रस्तुत ग्रंथात भक्तीचे महत्त्व सांगितले आहे. ‘माझ्या कीर्तनात रंगून जा, नाही तुला जगाचा विसर पाडला तर सांग !’, या भगवान श्रीकृष्णाच्या वचनातच भक्तीचे सार सामावले आहे. देवाची उपासना किंवा त्याचे नामसंकीर्तन करतांना त्यात स्वतःला पूर्णपणे विसरून जाणे महत्त्वाचे आहे. कलियुगात सव ु ‘सामान्यांनाही जमू शकणारी उपासना म्हणजे नामस्मरण. या नामसंकीर्तनाद्वारे ईश्वरप्राप्ती कशी करू शकतो, हे या ग्रंथात दिले आहे.

भक्तीमार्गावरून वाटचाल करणाऱ्या भक्तांसाठी या ग्रंथात ‘साधना म्हणजे काय ? साधनेचे प्रकार, साधनेतील प्रगतीची लक्षणे’, तसेच श्रीरामाची माहिती, उपवासाचे महत्त्व आणि प्रकार, देवाच्या नामजपाचे महत्त्व, प्रकार आणि त्यातील प्रगतीची लक्षणे सांगितली आहेत. यांबरोबरच ‘श्रद्धा कशी असावी ? भक्त कसा असावा ? भक्ताचे वागणे कसे असावे ?’, यांविषयीची माहिती अत्यंत सोप्या भाषेत आणि उदाहरणांसह दिली आहे.

हा ग्रंथ वाचून सर्वांची ईश्वरप्राप्तीची तळमळ वाढो आणि त्या दिशेने प्रयत्न होऊन ते ईश्वरी कृपेला प्राप्त होवोत, अशी श्रीगुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक.**